प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

मार्च 10, 2017

**आता रिझर्व बँकेची वेबसाईट अगदी तुमच्या आटोक्यत**

भारतीय रिझर्व बँकेच्या वेबसाईटच्या (www.rbi.org.in) मोबाईल ॲप्लिकेशन (ॲप) आवृत्तीचे, भारतीय रिझर्व बँकेने आज औपचारिक उद्घाटन केले. हे ॲप, ॲंड्रॉईड तसेच आयओएस मंचावरही उपलब्ध असून, ‘रिझर्व बँक ऑफ इंडिया’ हा की-वर्ड वापरुन, ॲंड्रॉईड फोन/फोन मधील अनुक्रमे प्ले स्टोअर/ॲप स्टोअर मधून डाऊनलोड करता येते.

सुरुवात म्हणून, वेबसाईटचे सर्वात जास्त ॲक्सेस केले जाणारे विभाग : वृत्तपत्र निवेदने, आयएफजी/एसआयसीआर कोड्स, बँकेच्या रजा आणि चार मुख्य चलनांचे संदर्भ दर व पॉलिसी दर ह्यासह विद्यमान दर, ह्या ॲपवर उपलब्ध करण्यात आले आहेत. ॲपच्या लॅंडिंग पेजच्या वरच्या बाजूवर एक डायनॅमिक विंडो असून, त्यात जनता-जागरणाचे तीन संदेश आलटून-पालटून दाखविले जातात. रु.2,000 व रु.500 च्या नव्या नोटांचे डिझाईन, तसेच ‘आरबीआय कहता है’ मालिकेखाली केवायसी वरील संदेश, ह्यामधील कशावरही क्लिक केल्यावर देण्यात आलेल्या जन-जागरणाचा संपूर्ण मजकुर, युजर ओपन करु शकतो व वाचू शकतो. नवीन वितरणावरील ॲलर्ट मिळविण्यासाठी, युजर, ‘पुश’ नोटिफिकेशन ॲक्टिवेट करु शकतो.

हे ॲप अधिक उपयुक्त व कुतुहलजनक करण्यासाठी, युजर्सनी त्यांच्या सूचना व फीडबॅक ई-मेलने पाठवाव्यात.

**शिबी एस. मथाई**
व्यवस्थापक

**वृत्तपत्र निवेदन : 2016-2017/2419**